# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/U / 211 / 2009 / 45 /** **Date :-**

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer ,
O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub:- Forwarding of grievance in respect Shri Rakesh Suryarao Oram, House No.10, Suyog Colony, Pariwar Apartment, Padampura, Aurangabad **( Consumer No. 490011215669 )**

Dear Sir,

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from** Shri Rakesh Suryarao Oram, House No.10, Suyog Colony, Pariwar Apartment, Padampura,Aurangabad

You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. **The hearing in the matter will be held on 26.05.2009 at 12=00 Hrs.**

Encl: As above

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad.

**Copy to:-**

Shri Rakesh Suryarao Oram,
House No.10, Suyog Colony,
Pariwar Apartment,
Padampura,
**Aurangabad**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२११/२००९/४५**

**तक्रार दाखल दिनांक :- ०८/०५/२००९**
**निकाल दिनांक :- २०/०६/२००९**

**श्री राकेश सुर्याराव ओरम,**
**घर नंबर १०,सुयोग कॉलनी,पदमपुरा**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११२१५६६९) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०८/०५/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २६/०५/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार यांनी सौ.सुभदा अशोक चित्तावार यांचे सुयोग कॉलनी,पदमपुरा येथील घर विकत घेतले असुन ते विजेचा वापर करीत आहेत. वरील ठिकाणी बसविण्यात आलेले वीज मीटर हे सौ.सुभदा अशोक चित्तावार यांच्या नांवे असुन वर्ष २००२ ते २००६ या काळात घर बंद असल्यामुळे वीज वापर नव्हता. अर्जदार यांनी ऑक्टोबर २००६ पासुन सदरील जागेंत राहण्यास आल्यानंतर त्यांनी वीज बिलावर दाखविण्यात आलेल्या थकबाकी रकमेबाबत महावितरणच्या संबंधीत विभागाकडे तक्रार केली पण त्यांचे तक्रारीचे निवारण न करता व वीज बिल दुरुस्त करुन न देता त्यांना पार्टपेमेट भरण्याचे सांगण्यात आले. महावितरणतर्फे या चुकीच्या थकीत वीज बिलापोटी अनेक वेळा त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला असल्याचे अर्जदाराने त्यांच्या तक्रारीत पुढे म्हटले आहे.महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल देण्याबाबत तसेंच मीटर त्यांच्या नांवावर नामातंर करुन देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचात केली.

२) दिनांक २६/०५/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री राकेश ओरम उपस्थित होते. महावितरण कंपनीतर्फे नोडल अधिकारी म्हणुन श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. त्यांनी जागा अर्जदाराच्या मालकीची असल्याबाबत तसेच अर्जदार वीज वापर करीत असल्याबाबत कोणताही पुरावा मंचात दाखल केलेला नसल्याचे मंचाच्या निदर्शनास आणुन दिले मंचाने अर्जदारास जागेचे खरेदीखत व नोडल अधिकारी यांना स्थळपाहणी करुन बिल रिव्हीजन प्रस्ताव, मीटर बदली अहवाल इत्यादी पुढील

सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे आदेश दिले. या प्रकरणाची सुनावणी दिनांक ०२/०६/२००६ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक ०२/०६/२००९ रोजी सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी मंचात बिल रिव्हीजन प्रस्ताव दाखल केला व १८०३८.०७/-पैसे क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली. मंचाने विचारणा केली असता या रक्कमेत व्याज व दंड कमी करण्यात आले नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवले.

४) मंचात दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागदपत्रावरुन असे अढळुन येते की दिनांक ०१/१०/२००२ रोजी सौ.सुभदा अशोक चित्तावार यांनी उपकार्यकारी अभियंता छावणी यांना पत्राद्वारे सदरील जागेत वीज वापर नसल्यामुळे (मीनीमम) स्थिर आकाराचे बिल आकारणी करण्याबाबत विनंती केली होती. ज्याची पोच पावती अर्जदाराने आपल्या तक्रारीसोबत जोडली आहे. अर्जदाराच्या या अर्जावर कनिष्ठ अभियंता रेल्वेस्टेशन युनिट यांनी सदर जागेची स्थळ पाहणी करुन त्यांचा अहवाल दिलेला आहे या अहवालाचे निरिक्षण केल्यावर मीटर वरील रिडींग ही ०८७५५ अशी असुन मीटर वर्किग असल्याबाबत तसेच अर्जदाराचा वीज वापर नसल्याचा शेरा दिला असल्याचा दिसुन येतो.नोडल अधिकारी यांच्यातर्फे मंचात दाखल करण्यात आलेल्या सी.पी.एल. चे निरिक्षण केल्यावर एप्रिल २००३ ते एप्रिल २००६ याकाळात अर्जदाराचा वीज वापर नसल्याचे तसेच अर्जदारास फॉल्टी स्टेटसचे वीज बिल दिल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी यांना आदेश दिल्यानंतर ही त्यांनी मीटर बदली अहवाल, सुधारीत बिल प्रस्ताव,स्थळ पाहणी अहवाल मंचात दाखल केला नाही. मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जुन २००२ ते सप्टेबर २००६ या काळात अर्जदाराचा एकुण वीज वापर हा

८९५०-८७५५=१९५ असा असल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे दिनांक ०१/१०/२००६ रोजी अर्जदाराचे मीटर बदलण्यात आल्याचे दिसुन येते एप्रिल २००९ मध्ये नोंदविलेल्या रिडींग वरुन ऑक्टोबर २००६ ते एप्रिल २००९ या काळातील अर्जदाराचा एकुण वीज वापर हा ३०४२-०१=३०४१ युनिट असल्याचे दिसुन येते.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर महावितरणतर्फे अर्जदारास चुकीच्या वीज बिलाचे आकारणी करण्यात आल्याचे स्पष्ट होते .अर्जदारास कोणतेही व्याज व दंड न लावता वरील नमुद केलेल्या वीज वापराप्रमाणे सुधारीत वीज बिल देणे योग्य ठरेल असे मंचाचे मंत आहे.

# आदेश

१) महावितरण वीज कंपनीने अर्जदारास जुन २००२ ते सप्टेबर २००६ या काळासाठी १९५ युनिट वापराचे तसेच ऑक्टोबर २००६ ते एप्रिल २००९ याकाळात ३०४१ युनिट वीज वापराचे विभागुन सुधारीत बिल ३० दिवसात द्यावे.

२) वरील प्रमाणे सुधारीत वीज बिल देतांना त्यात कोणतेही व्याज व दंड आकारु नये

३) अर्जदाराने वरील काळात भरलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलातुन करावी.

४) महावितरण कंपनीने अर्जदारास योग्य वीज बिल आकारणी न केल्यामुळे सेवेतील त्रुटी म्हणुन रुपये ५००/-नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.
गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२११/२००९/४५** **दिनांक :-**

**प्रति,**
**श्री राकेश सुर्याराव ओरम,**
**घर नंबर १०,सुयोग कॉलनी,पदमपुरा**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११२१५६६९)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२११/२००९/४५ )

आपण दिनांक ०८/०५/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**